1 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करिअर दालन उद्यापासून खुले

## मटा एज्युफेस्टची उत्सुकता शिगेला; तीन दिवस तज्ज्ञांचे मार्गदर्शन

कोल्हापूर टाइम्स टीम

शैक्षणिक टप्प्यावरचे दहावी व बारावीच्या परीक्षेचे महत्त्वाचे वळण विद्यार्थ्यांसह पालकांसाठी कलाटणी देणारे असते. विविध अभ्यासक्रमातील शिक्षणाच्या संधी, नोकरी व व्यवसायाच्या दिशा याबाबत योग्य वेळी मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. हीच गरज ओळखून महाराष्ट्र टाइम्सतर्फे मटा एज्युफेस्ट या करिअरविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन दोन ते चार जून या कालावधीत करण्यात आले आहे.

हॉटेल पॅव्हेलियनच्या मधुसूदन हॉलमध्ये होणाऱ्या या एज्युफेस्टचे मुख्य प्रायोजक चाटे एज्युकेशन ग्रुप आहे. सकाळी दहा ते रात्री आठ यावेळेत प्रदर्शनातील माहिती स्टॉल सुरू राहणार आहेत. यानिमित्ताने करिअरविषयक संधींबाबत तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, शैक्षणिक संस्था, वेगळे अभ्यासक्रमांची माहिती, नोकरी व व्यवसायाच्या संधी उपलब्ध असलेल्या नव्या दिशा याबाबत माहितीपूर्ण दालन खुले होणार आहे.

शनिवारी सकाळी अकरा वाजता जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांच्या हस्ते मटा एज्युफेस्टचे उदघाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर शोभा बोंद्रे असतील. सोमवारी ४ जून रोजी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत एज्युफेस्टचा समारोप होणार आहे.

दहावी व बारावीचा निकाल लागल्यानंतर घराघरात मुलांच्या पुढील अभ्यासक्रम निवडीसोबत करिअरची दिशा ठरवण्याची चर्चा सुरू होते. अनेक विषयांशी निगडीत वाटांमधून आपल्या करिअरसाठी योग्य वाट कोणती हे ठरवताना अनेकदा विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण होत असतो. अशावेळी योग्य मार्गदर्शन मिळाले तर भविष्य चांगल्याप्रकारे घडू शकते. मुलांना शैक्षणिकदृष्ट्या चांगले मार्गदर्शन मिळावे व त्यांच्यामनातील गोंधळ दूर व्हावा, यासाठी गेल्या सहा वर्षांपासून महाराष्ट्र टाइम्सच्यावतीने मटा एज्युफेस्ट हा उपक्रम आयोजित केला जातो. एकाच छताखाली विविध अभ्यासक्रम, करिअरमधील नवे प्रवाह, नोकरी किंवा स्वतंत्र्य व्यवसायासाठी योग्य करिअर याबाबत शिक्षण देणाऱ्या संस्थांची माहिती विद्यार्थ्यांना या एज्युफेस्टच्या माध्यमातून मिळते.

याचा फायदा विद्यार्थी व पालकांना योग्य करिअर निवडीसाठी निश्चित होतो. यामध्ये दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील नव्या संधी, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास, तयारी, व संधी, अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर यासह कला, वाणिज्य या शाखांमधील करिअरच्या संधींची विस्तृत माहिती दिली जाणार आहे. तसेच जूनपासून सुरू होत असलेल्या विविध प्रवेशप्रक्रियांबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. तीन दिवस सुरू राहणाऱ्या या प्रदर्शनात विद्यार्थी व पालकांना विनामूल्य प्रवेश देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स Presents Edufest 2018





शोभा बोंद्रे



डॉ. अविनाश सुभेदार



डॉ. देवानंद शिंदे



डॉ. कुणाल खेमनार



डॉ. भारत खराटे

### उद्या जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांच्या हस्ते उद्घाटन

शनिवारी (ता. २) सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांचे उद्घाटनपर भाषण होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता चाटे शिक्षण समुहाचे संचालक डॉ. भारत खराटे हे करिअरच्या संधी या विषयावर सखोल मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी पाच वाजता डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजचे केदार अयाचित हे भविष्य घडवणारे शिक्षण या विषयावर विवेचन करणार आहेत. तर सायंकाळी सहा वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार मार्गदर्शन करणार आहेत.

### तज्ज्ञ मार्गदर्शक

| वेळ | वक्ते | विषय |
|---|---|---|
| ११.०० | जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार | प्रशासकीय क्षेत्रातील संधी |
| १२.०० | डॉ. भारत खराटे | करिअरची संधी |
| ५.०० | केदार अयाचित | भविष्य घडवणारे शिक्षण |
| ६.०० | डॉ. कुणाल खेमणार | प्रशासनातील करिअर |

### मुलांना मिळणार करिअर टीप्स

३ जून रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख 'पालकांच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षा' या विषयावर मनोगत व्यक्त करणार आहेत. दुपारी १२ वाजता संजय घोडावत विद्यापीठाचे विराट गिरी यांचे 'योग्य करिअरची निवड' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी १ वाजता दिशा अ‍ॅकॅडमीचे राहुल प्रकाश हे 'दहावीनंतरचे करिअर' या विषयाची मांडणी करणार आहेत. ४ जून रोजी सकाळी अकरा वाजता विंग कमांडर विजय पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2018
पुढारी

# 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअर संधी' विषयावर रविवारी व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, कोल्हापूर स्थानिक केंद्र व तंत्रज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि. ३) रोजी दुपारी तीन वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात हे व्याख्यान होणार आहे. 'अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया -२०१८' या विषयावर डॉ. जयदीप बागी हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी मोफत असून बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पी. व्ही कडोले, मनोज चव्हाण यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे .

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
JUN 2018
सकाळ

# अभियांत्रिकी करिअरबाबत मार्गदर्शन

कोल्हापूर : इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स व तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठातर्फे ' अभियांत्रिकी शिक्षणातील करिअरच्या संधी व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया या विषयावर व्याख्यान होणार आहे. डॉ. जयदीप बागी, तंत्रज्ञान अधिविभाग हे विविध शाखांबाबत मार्गदर्शन करतील. रविवार (ता. ३) केशवराव भोसले नाट्यगृह दुपारी ३ वा. शिबिर होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JUN 2018
Times of India

# Varsity's word of caution about fake colleges

TIMES NEWS NETWORK

File photo



**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur has appealed to students to check the details about the college they are planning to take admission in so that they don't fall prey to false assurances of 100% placements and get duped.

Shivaji University, Kolhapur (SUK) pro-VC D T Shirke on Thursday that all the colleges affiliated with the varsity are provided with the affiliation certificate, which has to be mentioned by the college authorities in their prospectus.

"It is mandatory for the college to publish the certificate in the prospectus. Students and parents should check for this certificate. Also, a list of the state approved new courses and colleges will be available on the university's website," he said.

He added that it has been observed that various non-approved institutes run their courses without having proper approval from the apex bodies like University Grants Commission (UGC), All India Council for Technical Education (AICTE) and Distance Education Council (DEC) for distant courses.

"It is a particular education institute's responsibility to get a proper approval from the apex bodies as well as from the varsity. We have observed that colleges operate courses from other varsities without knowledge of the home university. Students should check out for that, as the awareness is the only key to get a proper education from authorised institutes," he said.

The student who gets admission in the non-approved college or courses will have to face the consequences and varsity cannot be blamed for it.

Shirke said that the information about the courses is available online these days on the UGC, AICTE as well as university websites. This can be checked and verified by the parents and students, which can save them a lot of time and energy.

It has to be noted that SUK has many as 283 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur districts with over 2.5 lakh students enrolled in various curses. The major chunk of the students in the division is admitted in the conventional courses like BA, BCom and BSc courses.

The results for HSC or Std XII were announced on Wednesday and the admission process to various college admissions will start now.

## Points to Remember

Do check the affiliation certificate issued to the college by the university

- Ensure the courses have approval certificates from apex bodies like UGC, AICTE, DEC, DTE
- Check for the NAAC grading of the particular college and varsity, as it gives overall idea about its academic as well as administrative performance
- Students and parents can check details of the colleges on the university website (www.unishivaji.ac.in)

# Career confusion main issue for HSC students: Counsellors

TIMES NEWS NETWORK

**The Kolhapur divisional board of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE) has set up a helpline to address queries that students may encounter after the Higher Secondary Certificate (HSC, Class XII) exam results that were announced online on Wednesday**

**Kolhapur:** Counsellors in the city had a busy day on Wednesday, after the HSC result were announced. According to them, many students were worried about choosing the right stream, while some were unhappy with their marks.

Shantinath Mallade, a counsellor appointed by the Kolhapur divisional board said that even though the availability of counsellors was not advertised properly in Satara, I received few calls and most of them were asking about career opportunities.

"A few callers asked about the supplementary exam and how they should prepare. I received calls on Thursday as well," he said.

The Kolhapur divisional board of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE) has set up a helpline to address queries that students may encounter after the Higher Secondary Certificate (HSC, Class XII) exam results that were announced online on Wednesday.

Another former counsellor said that many students, who could not clear the exam have a psychological fear of English and maths. Many even cry out their frustration. Keeping them calm and motivated during such times becomes the biggest challenge.

"Rising expectations, competition, comparison and status can make some parents feel insecure and inferior after results. The child's result becomes a prestige issue for some parents," the counsellor added.

The Kolhapur division fared second among the nine divisions with a pass percentage of 91% in HSC exams this year.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2018
पुढारी

# ओंकार गुरवची कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिसेसमध्ये निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या



एकात्मिक लष्करी सेवा (कम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिस) परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी ओंकार अनंत गुरव याने यश मिळविले. त्याची लष्करी सेवेत निवड झाली आहे. ओंकारचे मूळ गाव गडहिंग्लज तालुक्यातील हसूरसासगिरी असून, सध्या विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी येथे संगणक अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात तो शिकत आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यूपीएससी) २०१७ मध्ये देशपातळीवर परीक्षा घेण्यात आली. त्यात उत्तीर्ण झालेल्या पहिल्या शंभर उमेदवारांची डेहराडून येथील इंडियन मिलिटरी अ‍ॅकॅडमी (आयएमए) येथे प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येते. अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत ओंकार याने ९७ वे स्थान मिळवून आयएमएमध्ये आपले स्थान पक्के केले. डेहराडून येथील दीड वर्षाच्या प्रशिक्षणानंतर ओंकार गुरव भारतीय लष्करात लेफ्टनंट पदावर रुजू होईल. ओंकारचे प्राथमिक शिक्षण पिंपरी येथील जयहिंद विद्यालय आणि एसएनबीपी स्कूलमध्ये झाले आहे.

ओंकार गुरव याने अभियांत्रिकीचा अभ्यास करत असतानाच सीडीएस परीक्षेत यश मिळविले आहे. ही त्याची कामगिरी अत्यंत अभिमानास्पद असून विद्यापीठासह सर्वच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीसुद्धा प्रेरणादायी आहे. राज्य सेवा आणि केंद्रीय सेवा परीक्षांच्या पलीकडेही विविध क्षेत्रांत तरुणांसाठी अनेक संधी उपलब्ध असून, त्यांचा शोध आणि वेध घेण्याची गरज आहे. तसे केल्यास यश निश्चितपणे मिळते, हेच ओंकार याच्या यशातून अधोरेखित झाले आहे, अशी प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2018
लोकमत

# विद्यापीठातील ओंकार गुरवची लष्करी सेवेत निवड

## मूळचा गडहिंग्लज तालुक्यातील हसूरसासगिरी येथील

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या एकात्मिक लष्करी सेवा (कम्बाईड डिफेन्स सर्व्हिस) परीक्षेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी ओंकार अनंत गुरव याने यश मिळविले. त्याची लष्करी सेवेत निवड झाली आहे.

ओंकारचे मूळ गाव गडहिंग्लज तालुक्यातील हसूरसासगिरी असून सध्या विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी येथे संगणक अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिकत आहे. 'युपीएससी'तर्फे सन २०१७ मध्ये देशपातळीवर परीक्षा घेण्यात आली. त्यात उत्तीर्ण झालेल्या पहिल्या शंभर उमेदवारांची डेहराडून येथील इंडियन मिलिटरी अकॅडमी येथे प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येते. या परीक्षेत ओंकारने ९७वे स्थान मिळवून 'आयएमए'मध्ये आपले स्थान पक्के केले. डेहराडून येथील दीड वर्षांच्या प्रशिक्षणानंतर ओंकार हा भारतीय लष्करात लेफ्टनंट पदावर रुजू होईल.

त्याचे प्राथमिक शिक्षण पिंपरी येथील जयहिंद विद्यालय आणि एसएनबीपी स्कूलमध्ये झाले आहे. दरम्यान, ओंकार याने अभियांत्रिकीचा अभ्यास करत असतानाच सीडीएस परीक्षेत यश मिळविले आहे.

ही त्याची कामगिरी अत्यंत अभिमानास्पद असून विद्यापीठासह सर्वच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे, अशी प्रतिक्रिया कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली.

पुढारी



**कोल्हापूर : सामंजस्य करारावेळी उपस्थित मान्यवर.**

# विवेकानंद कॉलेजचा शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाशी सामंजस्य करार

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या अध्यक्षतेखाली सामंजस्य करार झाला. या कराराच्या माध्यमातून विविध विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविले जातील, अशी ग्वाही प्राचार्य डॉ. होनगेकर यांनी दिली. संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजीराव सोनाळकर म्हणाले, संघाची स्थापना दहा वर्षापुर्वी याच महाविद्यालयात झाली आहे. यावेळी प्रा. डॉ. डी. ए. देसाई यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे होते. प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
1 JUN 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# पाणावलेले डोळे अन् भावूक चेहरे!

## जिल्हा परिषदेतील १०० कर्मचारी झाले निवृत्त

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तीस-पस्तीस वर्षांच्या सेवेनंतर जिल्हा परिषदेचा निरोप घेत असताना पाणावलेले डोळे पाहून निरोप देणाऱ्यांचेही डोळे पाण्याने डबडबल्याचे दृश्य गुरुवारी जिल्हा परिषदेच्या विविध विभागात दुपारनंतर दिसत होते. जिल्हा परिषदेतील साधारणपणे १०० कर्मचारी निवृत्त झाले.

पूर्वी जन्मतारखेबाबत फारशी जागृतता नव्हती. मुलाला शाळेत घालत असताना त्यावेळी असणारा विशेष दिवस लक्षात ठेवला जायचा. त्यावरूनच काहीवेळा नावही ठेवली जायची. मुलाला शाळेत घालण्याची वेळ आली की मास्तरलाच सांगायचे त्या दिवशी अमूक होत, म्हणून. त्यावरून शाळेच्या दाखल्यावर मुलाची किंवा मुलीची जन्माची तारीख लिहिली जायची. त्यामुळे पन्नास वर्षांवर ज्यांचे सध्याचे वय आहे त्यापैकी बहुतांशी जन्माची तारीख ही १ जूनच असते. त्यामुळे ३१ मे रोजी निवृत्त होणाऱ्या शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असल्याने आज जवळपास सर्वच शासकीय कार्यालयात निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निरोप देण्यात येत होते.

जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील मिळून आज जवळपास शंभर कर्मचारी निवृत्त झाले. कार्यालयातील आज शेवटचा दिवस. सकाळी लवकर उठा, डबा घ्या, लवकर कार्यालयात जावा, साहेब चिडेल या गोष्टी उद्या (शुक्रवार) पासून बंद होणार आहेत. गेल्या तीस, पस्तीस वर्षापासूनच्या नित्यक्रमातून सुटका होणार होता. याचा आनंद मनात होताच, पण त्याचबरोबर रोज भेटणाऱ्या कार्यालयातील सहकाऱ्यांना आता भेटता येणार नाही याबद्दल वाईटही वाटत होते.

निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अशा वातावरणात त्यांचा कार्यालयातील आज शेवटचा दिवस सुरू झाला. रोज कार्यालयाची वेळ कधी संपते याकडे वाट पाहणारे हेच कर्मचारी दुपारनंतर आज दिवस लवकर मावळू लागला असे म्हणून लागले. दुपारनंतर आपापल्या विभागातील सहकाऱ्यांना निवृत्तीचा निरोप देण्यासाठी छोटे छोटे कार्यक्रम आयोजित केले होते. त्यामुळे दुपारनंतर जिल्हा परिषदेतील वातावरण भावूक झाले होते.

**विद्यापीठात सात कर्मचाऱ्यांना निरोप**

शिवाजी विद्यापीठातील सात अधिकारी-कर्मचारी गुरुवारी एकाच दिवशी प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले. या सातही जणांचा प्रशासनाने सत्कार केला. सहाय्यक कुलसचिव व्ही. एस. सावंत, अधिक्षक एस. के. मोरे, प्रयोगशाळा परिचर आर. बी. डोकरे, हवालदार पी. जी. शिरगावे, सेवक आर. एल. कांबळे, ए. एन. धनवडे, एस. डी. खामकर आदींचा यामध्ये समावेश आहे.

11 JUN 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## उच्च शिक्षणाच्या वाटा शोधताना एक योग्य पर्याय

# अभियांत्रिकी व तंत्रज्ञान

प्रिय विद्यार्थी, पालक व वाचक मित्रहो, आपण जेव्हा दहावी अथवा बारावीनंतरच्या शिक्षणाचा विचार करतो, त्यावेळी निश्चितच निवडलेल्या विद्याशाखेचे शिक्षण पूर्ण केल्यानंतरच्या संधींचा प्रामुख्याने विचार करतो. अशा संधी म्हणजे चांगली नोकरी, उच्च शिक्षण, संशोधन अथवा स्वयंरोजगार निर्मिती होय. या संधीबद्दलचा विचार करणे हे अगदीच योग्य आहे. त्यामुळे शिक्षणप्रवेश निश्चितीच्या काळामध्ये विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये प्रचंड संभ्रमावस्था निर्माण झालेली असते.

सर्वप्रथम इथे नमूद करावेसे वाटते की, शिक्षणाच्या सर्व विद्याशाखांना भविष्यात जाऊन वाव हा असतोच; परंतु त्या-त्या शाखांमध्ये चांगले ज्ञान व प्रावीण्य मिळविलेले, सर्व गुणकौशल्यसंपन्न व सकारात्मक वृत्तीचे विद्यार्थीच आपले भवितव्य चांगल्या प्रकारे घडवू शकतात. डार्विनचा नियम सांगतो की, 'Survial of the fittest' आपण जर आपल्या क्षेत्रात the fittest (सर्वोत्तम) असू तर आपल्याला स्पर्धेत टिकू अथवा नाही याची भीती बाळगण्याची गरज नसते. आता ज्यावेळी आपण आपले पुढील शिक्षण क्षेत्र निवडत असतो त्यावेळी निश्चितच आपल्या आवडीला अग्रक्रम द्यावा. त्यात प्रवेशासाठी जरूर प्रयत्न करावा; परंतु यदाकदाचित ते क्षेत्र आपणास मिळू शकले नाही तर ज्या क्षेत्रात आपण प्रवेश करू, त्या क्षेत्रामध्ये रस घेऊन, श्रद्धा ठेवून, गोडी निर्माण करणाऱ्यांचे योग्य ते मार्गदर्शन घेऊन मिळालेल्या क्षेत्रामध्ये आपणास उत्तमोत्तम काम कसे करता येईल हे पाहणे योग्य ठरेल. काम केल्याने निश्चितच कमी किंवा जास्त परंतु यश (फळ) मिळाल्याशिवाय राहत नाही.

मनुष्य हा इतर प्राण्यांहून वेगळा असा प्राणी आहे की जो आपल्या जीवनामध्ये नेहमी सुधारणांची अपेक्षा करीत असतो. त्याचाच परिणाम म्हणून मनुष्य हा सतत विचारशील व क्रियाशील राहून आपले जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करीत असतो. हे करीत असताना निश्चितच त्याचे जीवन गतिमान बनलेले आहे. या मानवाच्या अंगीकृत स्वभावामुळेच त्याने निसर्गाचा अभ्यास करताना वेगवेगळ्या विद्याशाखा निर्माण केल्या. या सर्व विद्याशाखांन्वये मिळणाऱ्या ज्ञानाचा वापर करून तो आपल्या गरजा पूर्ण करू लागला. आदिमानवाच्या सर्वप्रथम तीनच गरजा होत्या. त्या म्हणजे अन्न, वस्त्र व निवारा; परंतु आजचा मनुष्य हा या तीन गरजांवरच सीमित राहिलेला नसून त्याच्या गरजांची यादी दिवसेंदिवस वाढतच आहे.

या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाला मानवाने निर्माण केलेल्या विद्याशाखांपैकी विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखांचा आधार घ्यावा लागतो. म्हणूनच आजचा प्रगत जमाना हा आपण म्हणतो की यंत्र व तंत्रशिक्षणाचा जमाना आहे. (मंत्राशिवाय यंत्र नाही व यंत्राशिवाय तंत्र नाही.) Science (मंत्र) is the basis for Engineering (यंत्र) and Engineering is foundation for Technology (तंत्र)

ज्या देशामध्ये या तीन क्षेत्रांत चांगली प्रगती साधली आहे, तसेच या तीन क्षेत्रांत चांगला समन्वय आहे तो देश हा निश्चित प्रगत देश असल्याचे आढळून येते. प्रगत देश म्हणजे असा देश की, ज्या देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न हे जास्तीत जास्त आहे की ज्यान्वये लोकांना त्यांच्या मूलभूत गरजांशिवाय इतर गरजा त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून सहजासहजी मिळविता येतात.

साहजिकच आपल्याला भारत प्रगतिपथावर न्यायचा असेल तर आपण आपले स्वतःचे उत्पन्न, मग ते स्वयंरोजगारातून असो अथवा नोकरीतून असो; ते कसे वाढविता येईल याचा विचार करणे उचित ठरेल.

नक्कीच त्यासाठी शिक्षण व संस्कार ह्या बाबी महत्त्वपूर्ण ठरतात. आता शिक्षणाचा विचार करीत असताना एक पर्याय आपल्यापुढे येतो; तो म्हणजे विज्ञान व तंत्रशिक्षण की ज्याच्या माध्यमातून आपणास भविष्यातील संधी ह्या संख्येने इतर क्षेत्रांच्या तुलनेत जास्त आढळतात. खास करून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेचा विचार करायचा झाल्यास आजमितीस आपणापुढे शेकडो विविध अभियांत्रिकी अभ्यासक्रमांची यादी पाहावयास मिळते. या यादीपैकी विद्युत (Electrical), स्थापत्य (Civil), यंत्र (Mechanical) व रसायन (Chemical) अभियांत्रिकी या मूलभूत विद्याशाखा होत. असे आढळते की, सर्वच प्रकारच्या सरकारी व खासगी नोकऱ्यांकरिता या चार मूलभूत शाखांचे अभियंते जास्त प्रमाणात निवडले जातात.

अशा मूलभूत अभियांत्रिकी विद्याशाखेचे अध्यापन हे खासकरून सर्वच आय.आय.टी., एन. आय. टी., युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट्स, आय सी टी. मुंबईसारख्या नामांकित स्वायत्त संस्थांमध्ये उपलब्ध असल्याचे आढळते. या चार विद्याशाखांचे त्यांच्या-त्यांच्या अनेकविध प्रवर्गांत विस्तारीकरण होत गेलेले दिसते. त्यातूनच शेकडो विशिष्ट विद्याशाखेची निर्मिती झाली. पर्यायाने आज विद्यार्थ्याला शिक्षण घेत असताना त्याच्या आवडीच्या क्षेत्रात प्रवेश घेण्याच्या संधी उपलब्ध होत आहेत. अभ्यासक्रमाची निवड करताना सर्वप्रथम मूलभूत अभियांत्रिकी विद्याशाखांना प्राधान्य देणे हिताचे ठरते; कारण अशा शाखांमधून शिक्षण घेतलेले अभियंते जवळजवळ सर्वच उद्योगांमध्ये नोकरी तसेच स्वयंरोजगार निर्माणासाठी अधिक सक्षम बनतात. काळाची गरज ओळखूनच की काय, आपल्या देशामध्ये सध्या तंत्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या वाढत आहे. त्यामुळे असे महत्त्वपूर्ण शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या जवळपास सर्वांनाच त्यांच्या संधी उपलब्ध होत आहेत. हेही तितकेच महत्त्वाचे की, असे शिक्षण घेणे अथवा देणे हे खर्चिक असल्याने ते फुकट मिळेल, ही अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरेल. सकारात्मक बाब म्हणजे सर्वच इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना मिळत असलेली ही उज्ज्वल भविष्याची संधी होय. या संधीचे सोने करणे हे सर्वस्वी त्या-त्या विद्यार्थ्यावर अवलंबून असेल. अभियांत्रिकी शिक्षणासाठी प्रवेश मिळाला व ते पूर्ण केले म्हणजे आपणास नोकरी मिळणारच असा ग्रह न बाळगता प्रत्येक विद्यार्थ्याने निवडलेल्या अभ्यासक्रमाद्वारे स्वतःचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे ठरेल.

- प्रा. प्रविणकुमार दिनकर पाटील,
डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी,
शिवाजी विद्यापीठ